महाराष्ट्र वन विभाग

## मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे वनवृत्त, ठाणे यांचे कार्यालय

मायक्रो वेव्ह टॉवर, बारा बंगला एरिया, कोपरी, ठाणे (पूर्व) 400 603.
फोन : 022-25329865/ 25329642, फॅक्स 022-25329912.
Email: ccftthane@mahaforest.gov.in / ccfthane@gmail.com
Website: www.mahaforest.gov.in

ISO 9001:2008 Certified by IRQS

MGMT. SYS. RvA C 071

**विषय : एकरेषिय (Linear) प्रकल्पांबाबत झाडे तोडण्यास व कामे सुरु करणेसाठी परवानगी देण्याबाबत.**

**Diversion of 0.91 ha. Forest Land in favour of Executive Director (Planning) Mumbai Metro Railway Corporation, Bandra (East), Mumbai for construction of Bandra-Kurla Complex (BKC) Railway Station for Metro Rail Project-III in Mumbai City District in State of Maharashtra – regarding.**

जा.क्र. कक्ष-१०/वसं/प्र.क्र.१०/१६-१७/जा.क्र.३४७/१७-१८
ठाणे - ४००६०३, दिनांक - २४/०७/२०१७

वाचा:-

१) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचेकडील पत्र क्र.कक्ष-१७/NC-II/ID-१२४४५६(६०)/८८५, दिनांक ०९.०८.२०१६.

२) केंद्र शासन पत्र क्र.एफसी नं.१/एमएच-४३/२०१६/NGP-1800, दिनांक १७.०५.२०१७.

३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष मुंबई यांचेकडील पत्र क्र.जमिन/१०२२, दिनांक १३.०७.२०१७.

४) मुख्य वनसंरक्षक, (मंत्रालय) मुंबई यांचेकडील पत्र क्र.एफएलडी-१११६/प्र.क्र.२७०/फ-१० दिनांक २०.७.२०१७.

५) केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-११-३०६/२०१४/एफसी, दि. ८.८.२०१४.

६) केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-१-३०६/२०१४/एफसी, दि. १५.१.२०१५.

७) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ नं.११/३०६/२०१४, दि. ७.५.२०१५.

८) शासन परिपत्रक क्र.एफएलडी-२०१५/प्र.क्र.७७/फ-१०, दि.१.७.२०१५.

**आदेश -**

ज्याअर्थी, राज्य शासनाचे महसुल व वनविभागाकडून कार्यकारी निर्देशक (नियोजन), मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन लि. (MMRCL) बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांचेकडून प्राप्त झालेला मुंबई मेट्रो लाईन क्र.३ (कुलाबा ते सीप्ज) करीता ०.९१ हेक्टर कांदळवन वनजमिन वळतेकरण प्रस्ताव उपरोक्त संदर्भित पत्र क्र.१ अन्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा., नागपूर यांचेकडून केंद्र शासनास सादर झाला होता.

आणि ज्याअर्थी, कार्यकारी निर्देशक (नियोजन), मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन लि. (MMRCL) बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेला वळतेकरण प्रस्ताव, भारत सरकारच्या वन (संवर्धन) अधिनियम १९८० च्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रकल्प स्थळ विवक्षित (Site Specific) आहे.

आणि ज्याअर्थी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष मुंबई, व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर या प्रस्तावाची छाननी केल्यानंतर वन (संवर्धन) अधिनियम १९८० च्या तरतुदीनुसार ०.९१ हेक्टर वनजमिन वळते करण्याची केंद्रशासनास शिफारस केली आहे.

आणि ज्याअर्थी, भारत सरकारने या प्रस्तावावर विचार करुन, राज्य शासनाने सादर केलेल्या प्रस्तावास अ.क्र.२ अन्वये काही अटीं शर्थीच्या अधिन राहून तत्वतः मंजुरी प्रदान केली आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावातंर्गत कांदळवन वनजमिनीच्या बदल्यात कांदळवन कक्षाकडून क्षेत्र मौजे कोपरखैरणे, नवी मुंबई, ता.ठाणे येथील सर्व्हे क्र.३१२ चे १.०० हेक्टर, क्षेत्र येथे अवनत वनक्षेत्रावर पर्यायी वनीकरण प्रस्तावित केले आहे.

आणि ज्याअर्थी, पर्यायी वनीकरणाकरिता रक्कम रु.३०८२३६/-, नक्त वर्तमान मुल्यांकरिता रक्कम रु.९४९१३०/-, एवढी प्रकल्प यंत्रणेने Adhoc Campa कडे वर्ग केली आहे. तसेच प्रकल्प यंत्रणेने वृक्षतोडीच्या खर्चापोटी रु.१४०४९/- हे State Campa Divisional Forest Officer (Mangroves) Mumbai Mangroves Conservation Unit कडे वर्ग केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालय, मुंबई जनहित याचीका क्र.८७/२००६ मध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने कांदळवन क्षेत्राच्या संबंधात प्रकल्प यंत्रणेने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या नोटीस ऑफ मोशन क्र.३१९/२०१७ मध्ये मा. न्यायालयाने दि.१३.०६.२०१६ रोजी निर्णय पारित करुन परवानगी दिली आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी वनहक्क कायदा, २००६ प्रमाणपत्र जारी केलेले आहे. बाबत प्रस्तावांतर्गत वनक्षेत्रात पट्टेधारक/ पात्र प्लॉट धारक इत्यादी येत असल्यास नियमानुसार पुर्नवसन/मोबदला देण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.

आणि ज्याअर्थी, केंद्रशासनाच्या तत्वतः मान्यता पत्रातील अट क्र.५ नुसार In-situ Mangrove Restoration Plan अंमलबजावणीकरीता मुंबई कांदळवन कक्षाकडून मंजूरीप्राप्त आराखडा प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने मुंबई कांदळवन संरक्षण कक्षाकडून कार्यन्वित करावा. त्यासाठी मंजुर आराखड्यानुसार रक्कम रुपये २,२२,०१,७३२/- एवढी प्रकल्प यंत्रणेने अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष मुंबई यांच्याकडे ज़मा करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावांतर्गत समाविष्ट संरक्षित कांदळवनाचे ०.९१ हेक्टर क्षेत्रातील झाडे तोडणे व कामे सुरु करण्यासाठी परवानगी देण्याची बाब विचारात घेण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, वरील अ.क्र. ५ व ६ अन्वये एकरेषीय प्रकल्पा संदर्भात केंद्र शासनाने मार्गदर्शक सूचना जारी केलेले आहेत. तसेच केंद्रशासनाने वरील अ.क्र. ७ अन्वये वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत एकरेषीय प्रकल्पांना (Linear Projects) तत्वतः मान्यता मिळाल्यानंतर काही अटींच्या अधिन राहून काम सुरु करण्यास व झाडे तोडण्यास परवानगी देणे बाबत सर्वसाधारण मान्यता दिली आहे.

आणि ज्याअर्थी, वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत नवीन रस्ते, अस्तित्वात असलेले महामार्गाचे रुंदीकरण, ट्रान्समिशन लाईन, पाण्याची पाईप लाईन, ऑप्टीकल फायबर केबल लाईन, रेल्वे लाईन इत्यादी एकरेषिय (Linear) प्रकल्पांना तत्वतः मान्यता दिल्यानंतर प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु करुन सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर तत्वतः मान्यता दिलेल्या पत्रातील आवश्यक अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणेने केल्यानंतर प्रकल्पांतर्गत वन जमिनीवरील झाडे तोडण्यास व कामे सुरु करणेसाठी परवानगी देण्याकरिता राज्य शासनाचे वरील अ.क्र.८ चे परिपत्रकातील अटीस अधीन राहून अशी परवानगी देणेसाठी मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यांना प्राधिकृत केले आहे.

त्याअर्थी, असे निर्देश देत आहे की, प्रकल्प प्राधिकरण म्हणजेच कार्यकारी निर्देशक (नियोजन), मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन लि. (MMRCL) बांद्रा-कुर्ला कॉप्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांना मुंबई मेट्रो लाईन क्र.३ (कुलाबा ते सीप्ज) करीता ०.९१ हेक्टर वनजमिन वळतेकरण प्रस्ताव, खाली दिलेल्या अनुसूची मध्ये नमूद केलेली आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष मुंबई यांनी सादर केलेले प्रकल्प प्रस्तावातील तपशिलात नमूद केलेली ०.९१ हेक्टर वळतेकरण क्षेत्रात झाडे तोडण्यास व कामे सुरु करण्यास परवानगी देत आहे. ही परवानगी केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या उपरोक्त संदर्भित पत्रातील अटी/शर्तीच्या पूर्ततेच्या अधिन राहून तसेच खालील अटींच्यां अधिन राहून देण्यात येत आहेः-

१) सदर परवानगी प्रकल्पांतर्गत वनक्षेत्रात कामे करण्यापुरती मर्यादित आहे.

२) **प्रकल्प यंत्रणेने वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत विधीवत मान्यता मिळालेल्या पत्रातील अटींची पुर्तता तात्काळ होईल याबाबत दक्षता घ्यावी. विधीवत मान्यता मिळालेल्या दिनांका पासून** ६ महिन्याच्या आत प्रकल्प यंत्रणा सर्व अटींचे तंतोतंत पालन करेल याची उप विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन कक्ष हे खात्री करतील. आणि वेळोवेळी याबाबतचा अहवाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष मुंबई यांना सादर करतील.

३) प्रकल्प यंत्रणेने प्रस्तावीत वनजमिनीवर काम सुरु करण्यापूर्वी, सबंधित उप विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन कक्ष यांना कळविणे आवश्यक आहे. सबंधित उप विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन कक्ष यांनी कामे सुरु असतांना प्रस्तावित वन जमीनीवर वनभंग झाला आहे का ते पाहणे. तसेच वनभंग झाला असल्यास, प्रचलित कायद्यानुसार कारवाई करावी.

४) **सदर प्रकल्पास केंद्र शासनाकडून विधीवत मान्यता आणि राज्य शासनाकडून औपचारिक वनक्षेत्र वळते करण्याचे आदेश अप्राप्त आहेत. सदर आदेश / मान्यता देताना घालून दिलेल्या अटीं / शर्ती** प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहतील.

५) प्रकल्प यंत्रणेकडून कामे करतांना जे कांदळवन वृक्ष काढावे लागणार आहेत, त्यांना कमीत कमी हानी पोहोचेल ही बाब प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

६) मा. उच्च न्यायालय, मुंबई जनहित याचीका क्र.८७/२००६ मध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने कांदळवन क्षेत्राच्या संबंधात प्रकल्प यंत्रणेने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या नोटीस ऑफ मोशन क्र.३१९/२०१७ मध्ये मा. न्यायालयाने दि.१३.०६.२०१७ रोजी पारित केलेल्या निर्णयात घालून दिलेल्या अटी / शर्ती प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहतील.

७) केंद्रशासनाच्या तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.५ नुसार In-situ Mangrove Restoration Plan अंमलबजावणीकरीता मुंबई कांदळवन कक्षाकडून मंजूरीप्राप्त आराखडा प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने मुंबई कांदळवन संरक्षण कक्षाकडून कार्यन्वित करावा. त्यासाठी मंजुर आरखड्यानुसार रक्कम रुपये २,२२,०१७३२/- एवढी प्रकल्प यंत्रणेने अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष मुंबई यांच्याकडे जमा करणे आवश्यक आहे.

८) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी वनहक्क कायदा, २००६ प्रमाणपत्र जारी केलेले आहे. बाबत प्रस्तावांतर्गत वनक्षेत्रात पट्टेधारक/ पात्र प्लॉट धारक इत्यादी येत असल्यास नियमानुसार पुर्नवसन/मोबदला देण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.

९) पर्यावरण व वनमंत्रालयाने वन व वन्यजीव विकास व संवर्धन या दृष्टीने वेळोवेळी घातलेल्या व घालण्यात येणा-या इतर अटी प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहतील.

१०) मेट्रो स्थानकाचे बांधकामाचे प्लॅन नुसार येणारे साकाव / पूल यांचे बांधकाम करताना नैसर्गिक पाण्याचे मार्ग नदी, नाले, पाण्याचे प्रवाह बंद होणार नाहीत. तसेच वन्यप्राणी यांचे जाण्या-येण्याचे मार्ग बंद होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

११) प्रकल्प पूर्ण झाल्यावर सदरच्याच जागेवर कांदळवनाचा पुर्नस्थापना (In situ Restoration Plan) ची अंमलबजावणी करण्याकरीता कांदळवन कक्षाने तयार केलेल्या आराखड्याचे मूल्य प्रकल्प यंत्रणा यांनी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन) यांच्याकडे त्यांच्या सुचनेप्रमाणे निर्धारित केलेले रक्कम जमा करावयाची आहे.

१२) उपरोक्त अटीं पैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (Non Compliance) संबंधित उपवनसंरक्षक, वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत दिनांक २५.१०.१९९२ रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना मधील कलम १.९ नुसार अहवाल सादर करतील.

## अनुसुची

| गावांचे नांव | जिल्हा | सर्व्हे नंबर | वैधानिक दर्जा | क्षेत्र हेक्टर |
|---|---|---|---|---|
| बांद्रा पूर्व | मुंबई उपनगर | सिटी सर्व्हे क्र.६२९ पै | खाजगी कांदळवन क्षेत्र | ०.८४ |
| परिघाची खाडी | मुंबई उपनगर | सर्व्हे क्र.४, सिटी सर्व्हे क्र.८ | संरक्षित कांदळवन क्षेत्र | ०.०७ |
| | | **एकूण एकंदर** | | **०.९१** |

सदर आदेशाची प्रत स्थानिक संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयाचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच सदर आदेश त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर, सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शित करावी.

सदर आदेश महाराष्ट्र शासन वनविभागाचे www.mahaforest.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

**(सुनील लिमये)**
**मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे**

प्रती,

विभागीय वन अधिकारी
मुंबई कांदळवन संरक्षण कक्ष

प्रतिलिपी :- सचिव (वने) मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई, SRA इमारत, दुसरा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व) - ४०० ०५१ यांजकडे माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी :- उपवनसंरक्षक ठाणे, यांजकडे माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रतिलिपी :- जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी :- आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे माहिती तथा आवश्यक कार्यवाही सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी :- कार्यकारी निर्देशक (नियोजन), मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन लि. (MMRCL) बांद्रा-कुर्ला कॉप्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२.०० निर्देशित करण्यात येते की, या संदर्भातील सर्व आदेश सर्व्हे क्र., क्षेत्र आणि वैधानिक दर्जा आणि केंद्र शासनाने मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व संरक्षित बाबी यांच्यासह एका स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिध्द अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत. आणि त्याची प्रत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई व मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे संबंधित उपवनसंरक्षक यांना देण्यात यावी.

प्रतिलिपी :- एकरेषिय प्रकल्प निवड नस्ती, वनवृत्त कार्यालय ठाणे.

प्रतिलिपी - कक्ष-११ (तांत्रिक), वनवृत्त कार्यालय ठाणे यांचेकडे वरील आदेश शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी रवाना.

**मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे.**